चंद्रपूरच्या ऐतिहासिक वैभवाचा ठेवा जपण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार सरसावले ; जटपुरा गेटच्या तातडीच्या दुरुस्तीची आग्रही मागणी!

दगडी बांधकामातील सांध्यांमध्ये मोठ्या प्रमाणात फटी; संरचनेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तांत्रिक तपासणी करण्याची आ.मुनगंटीवार यांची मागणी

जिल्हाधिकारी चंद्रपूर आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधीक्षक पुरातत्त्वज्ञांना पत्र; मूळ स्थापत्यशैली जपत शास्त्रोक्त पद्धतीने जतन-संवर्धन करण्यावर भर

चंद्रपूर : चंद्रपूरच्या ऐतिहासिक अस्मितेचा अभिमानास्पद वारसा आणि गोंडकालीन वैभवाची साक्ष देणाऱ्या जटपुरा गेटच्या संरक्षणासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. शेकडो वर्षांच्या इतिहासाचे साक्षीदार असलेल्या या ऐतिहासिक वास्तूच्या अंतर्गत बाजूच्या दगडी बांधकामातील सांध्यांमध्ये मोठ्या प्रमाणात फटी निर्माण झाल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली आहे. इतिहासाचा हा अमूल्य ठेवा काळाच्या ओघात दुर्लक्षित राहू नये आणि वास्तूच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी आ.मुनगंटीवार यांनी तातडीने हालचाली करण्याची मागणी केली आहे. जटपुरा गेटची तज्ज्ञांमार्फत प्रत्यक्ष पाहणी, तांत्रिक तपासणी आणि आवश्यक दुरुस्ती व शास्त्रोक्त जतन-संवर्धनाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत, अशी आग्रही मागणी त्यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर तसेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई मंडळाच्या अधीक्षक पुरातत्त्वज्ञांकडे पत्राद्वारे केली आहे.

चंद्रपूरचा इतिहास, सांस्कृतिक परंपरा आणि स्थापत्यवैभव यांचे दर्शन घडविणाऱ्या जटपुरा गेटचे जतन करणे ही काळाची गरज आहे. ऐतिहासिक वास्तूंची देखभाल करताना केवळ वरवरची दुरुस्ती न करता त्यांच्या मूळ रचनेचे आणि ऐतिहासिक वैशिष्ट्यांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. या भूमिकेतून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधत या वास्तूच्या संरक्षणासाठी ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.जटपुरा गेटच्या अंतर्गत बाजूला दगडांमधील सांधे अनेक ठिकाणी उघडलेले असून, बांधकामामध्ये फटी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. या स्थितीचा वास्तूच्या संरचनात्मक स्थैर्यावर काय परिणाम होऊ शकतो, याची तज्ज्ञांकडून तपासणी होणे आवश्यक आहे. वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि तांत्रिक दुरुस्ती केल्यास भविष्यात होणारे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते, असे आमदार मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

## तज्ज्ञांकडून तपासणी करून शास्त्रोक्त दुरुस्तीची मागणी

जटपुरा गेटची पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञ अधिकारी आणि अभियंत्यांमार्फत तातडीने प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात यावी, दगडांमधील सांधे, फटी, बांधकामाची झीज आणि दगडांची स्थिरता यांचे सविस्तर तांत्रिक मूल्यमापन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान संरचनेला तातडीचा धोका आढळल्यास आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी कार्यवाही करावी, असेही आ.सुधीर मुनगंटीवार यांनी सुचविले आहे.तसेच, दगडी बांधकामातील उघडलेले सांधे आणि फटींची दुरुस्ती करताना वास्तूची मूळ स्थापत्यशैली व ऐतिहासिक स्वरूप अबाधित राहील, याची दक्षता घ्यावी. पुरातत्त्वीय तत्त्वांनुसार दुरुस्तीचा तांत्रिक आराखडा आणि अंदाजपत्रक तयार करून काम प्राधान्याने हाती घ्यावे, अशी मागणीही पत्राद्वारे आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

## नियमित देखभाल आणि कार्यवाहीच्या अहवालावर भर

जटपुरा गेटचे भविष्यात नुकसान होऊ नये, यासाठी नियमित देखभाल, वेळोवेळी तांत्रिक तपासणी आणि संरचनात्मक स्थितीचे निरीक्षण करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आमदार मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली आहे. स्थळपाहणीचे निष्कर्ष, तांत्रिक मूल्यमापन, प्रस्तावित दुरुस्तीची कार्यपद्धती आणि कामासाठी निश्चित केलेली कालमर्यादा यांचा सविस्तर अहवाल उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान झाल्यानंतर त्यांचे मूळ स्वरूप पूर्ववत करणे अनेकदा कठीण ठरते. त्यामुळे नुकसान वाढण्याची वाट न पाहता वेळीच संरक्षणात्मक उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे.

## जटपुरा गेट ऐतिहासिक अस्मितेचा आणि गोंडकालीन वैभवाचा ठेवा

जटपुरा गेट हा चंद्रपूरच्या ऐतिहासिक अस्मितेचा आणि गोंडकालीन वैभवाचा महत्त्वपूर्ण ठेवा आहे. या वास्तूचे शास्त्रोक्त पद्धतीने जतन-संवर्धन करून हा अमूल्य वारसा भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवावा, अशी आग्रही भूमिका आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी घेतली आहे.